# वाणिज्य विभाग अहवाल
# शैक्षणिक वर्ष २०२३-२४

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वाणिज्य विभागाचा अहवाल खालीलप्रमाणे देत आहोत.

या शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयांमध्ये एकूण एफ.वाय.बी.कॉम ७६ विद्यार्थी, एस.वाय.बी.कॉम ६० विद्यार्थी, टी.वाय.बी.कॉम ८३ विद्यार्थी, एम कॉम प्रथम वर्ष २५ तर एम कॉम द्वितीय वर्ष १८ विद्यार्थी प्रवेशित होते. एस.वाय.बी.कॉम मधील १६ विद्यार्थ्यांनी व्यावसायिक उद्योजकता तर ४४ विद्यार्थ्यांनी कॉस्टिंग विषय विशेष स्तरावर घेतले होते. टी..वाय.बी.कॉम मधील १२ विद्यार्थ्यांनी व्यावसायिक उद्योजकता तर ७१ विद्यार्थ्यांनी कॉस्टिंग विषय विशेष स्तरावर घेतले होते.

वाणिज्य विभागामार्फत या शैक्षणिक वर्षांमध्ये पुढील उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आलेले आहेत. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे देत आहोत.

1] महाविद्यालयात नवीन प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा मिळावी व महाविद्यालयीन वातावरणाशी विद्यार्थी समरस व्हावेत या हेतूने वाणिज्य विभागातील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांतर्फे विभागातील सर्व प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ १४ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता.

2 ] दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ ते ७ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये मिळावे म्हणून मोरडे फूड प्रॉडक्ट कंपनीचे व्यवस्थापक मा. श्री. मदन देशपांडे सर सनदी लेखापाल यांच्या मार्गदर्शनाखाली SAP (System Application Program) या कोर्सचे आयोजन करण्यात आले होते. या कोर्स साठी महाविद्यालयामार्फत १० युझर चे सॉफ्टवेअर खरेदी करून विद्यार्थ्यांना सरावासाठी वाणिज्य संगणक कक्षात उपलब्ध करून देण्यात आले. या कोर्सचा फायदा तृतीय वर्ष वाणिज्य मधील ५० विद्यार्थ्यांनी घेतला. संस्थेचे व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ह्या कोर्सच्या आयोजनासाठी विभागप्रमुख प्रा.डॉ. मोकळं सर यांचे मार्गदर्शन लाभले. या कोर्सचे समन्वयक म्हणून प्रा. कदम एस. सी. म्हणून काम पहिले

3] महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केले होते त्यामध्ये प्रामुख्याने श्री . राजेश डांगी (सी.ए.) श्री.संदीप मालुसुरे,सत्यम संस्था ,मुंबई ,श्री .राजेश पवार (सी.ए.), श्री.उत्कर्ष काळे सर टॅक्स कन्सल्टंट दिनांक 24 मार्च, निलेश फुलवडे सर टॅक्स कन्सल्टंट दिनांक 18 मार्च,प्राध्यापक ताजने सर,टॅक्सकन्सल्टंट 13 मार्च. या सर्व तज्ञ व्यक्तींची व्याख्याने महाविद्यालयात झाली यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञानाची माहिती झाली.

5] महाविद्यालयामध्ये दिनांक २९/१२/२०२३ ते १५/०१/२०२४ Employability Skill Development आणि दिनांक १२/०२/२०२४ ते ०५/०३/२०२४ दरम्यान Computersied Accounting हे Value Added Course घेण्यात आले. यामध्ये प्राध्यापक खरात सर व प्राध्यापक कदम सर यांनी यासाठी विशेष मार्गदर्शन केलेले आहे.

6] महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक कौशल्य विकसित व्हावीत, त्यांच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक व भौगोलिक ज्ञानाच्या कक्षा विस्तारास वाव मिळावा यासाठी या शैक्षणिक वर्षात दिनांक ३०/०१/२०२४ व ३१/०१/२०२४ रोजी दोन दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये कोल्हापूर येथील कण्हेरी मठ, राजर्षी शाहू महाराज यांचा राजवाडा, रंकाळा तलाव, महालक्ष्मी मंदिर, ज्योतिबा मंदिर आणि गणपतीपुळे या ठिकाणांस भेटी दिल्या. या सहलीत विभागातील ५३ विद्यार्थिनी २५ विद्यार्थी असे एकूण ७८ विद्यार्थी सहभागी झाले. या

सहलीसाठी विभागातील प्राध्यापिका शितल बोऱ्हाडे मॅडम, रेश्मा शिंदे मॅडम, रेखा कडाळे मॅडम, सुर्यकांत कदम, इंग्रजी विभागाचे प्रा. संतोष खरात सर व अर्थशास्त्र विभागाचे प्रविण पारधी सर असे ६ प्राध्यापक सहभागी झाले होते. सहलीसाठी एस. टी. महामंडळाच्या २ बस नेण्यात आल्या होत्या. चार भिंतीबाहेर विखुरलेल्या ज्ञानाचा शोध घेत घेत सहलीचा आनंदही विद्यार्थ्यांनी मनमुरादपणे लुटला.
7] शैक्षणिक कार्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित होत असलेल्या भीमाशंकर करंडक व महाविद्यालयीन युवक महोत्सव यामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. भीमाशंकर करंडक मध्ये एकांकिका स्पर्धेत तृतीय वर्षाच्या काजल देशमुख हिने प्रथम क्रमांक तर सलोनी पाठक हिने वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. महविद्यालयातील रांगोळी स्पर्धेत प्रथम वर्षाच्या मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला. वार्षिक क्रीडा महोत्सवात कबड्डी मध्ये मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले तर मुलांचे सामुहिक विजेतेपद वाणिज्य विभागास मिळाले. युवकमहोत्सवाच्या निमित्ताने ट्रॅडिशनल डे, Black & White डे व साडी डे इत्यादीचे आयोजन दिनांक २ व ३ फेब्रुवारी २०२४ दरम्यान करण्यात आले होते.
9] ५ मार्च २०२३ रोजी यंग लीडर इंटरशिप संस्थामार्फत वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना नोकरीच्या सुवर्णसंधी अंतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
या विभागातील माझे सहकारी प्राध्यापिका शितल बोऱ्हाडे मॅडम, रेश्मा शिंदे मॅडम, रेखा कडाळे मॅडम, यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. वाल्हेकर सर यांचेही वेळोवेळी मार्गदर्शनव सहकार्य लाभलेले आहे या सर्वांचा मी विभाग समन्वयक म्हणून आभारी आहे.

प्रा. सुर्यकांत चिंतामण कदम
वाणिज्य विभाग समन्वयक
बी.डी.काळे महाविद्यालय घोडेगाव